**संच : क**

# शिक्षकांसाठी सूचना सातवी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७–१८

### इयत्ता – सातवी
### विषय : मराठी

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ५०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** :
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) वायफळ | २) मैदान |
| ३) सूर्यमाला | ४) कुऱ्हाड |
| ५) अन्नदान | ६) पत्रकार |
| ७) निबंध | ८) फॅशन |
| ९) शुभ्र | १०) पेट्रोल |

**गुणदान** : **प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'मैदान' ऐवजी 'मयदान' किंवा 'निबंध' ऐवजी 'निबंद'/'निंबध' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न २)** रूपाली चव्हाण (गुण १)

**प्रश्न ३)** **क)** ढगांतून तरंगत जात असल्याचा (गुण २)

**प्रश्न ४)** प्लॅटफार्म चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी सरकते जिने, टोकन टाकताच उघडणाऱ्या झडपा, मेट्रोच्या डब्यांचे आपोआप उघडणारे व बंद होणारे दरवाजे, वातानुकूलित स्वच्छ डबे, झूम वेगाने धावते (यापैकी कोणतीही दोन वैशिष्ट्य लिहिल्यास दोन गुण.) (गुण २)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**प्रश्न ५ ते ७) खाली दिलेली कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ५)** **क)** सूर्य उगवण्याची (गुण १)

**प्रश्न ६)** पक्ष्यांच्या, विहंगाच्या, पाखरांच्या इ. अचूक उत्तरास एक गुण द्यावा. (गुण २)

**प्रश्न ७)** सकाळ झाल्याच्या आनंदात पारिजात बहरून त्याचा सडा पडेल व सुगंध पसरेल.
(याप्रमाणे जवळचा अर्थ लिहिल्यास गुण द्यावेत.) (गुण २)

**प्रश्न ८ ते १०) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ८)** **क)** पीयुषच्या गाईचे (गुण १)

**प्रश्न ९)** गायींना पीयुष गरमा-गरम पोळ्या घेऊन गेला, त्या त्याच्या ओळखीच्या नव्हत्या म्हणून आईला काळजी वाटली. (गुण २)
(या अर्थाने आलेल्या स्थानिक भाषेतील उत्तराचा स्वीकार करावा.)

**प्रश्न १०)** काळ्या रंगाची व तपकिरी मोठ्या डोळ्यांची होती. (गुण २)

**प्रश्न ११ ते १३) हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ११)** तुम्हाला/आपल्याला काय हवे ते (गुण १)

**प्रश्न १२)** **अ)** पैशाने फक्त देवाण-घेवाण करता येते म्हणून. (गुण २)

**प्रश्न १३)** झोप, मैत्री, प्रेम (गुण २)

**प्रश्न १४)** पर्वत - सामान्य नाम (गुण २)
चपळाईने - भाववाचक नाम

**प्रश्न १५)** **क)** हाताची पाचही बोटे सारखी नसतात. (गुण २)

**प्रश्न १६)** **अ)** पाहुण्यांसाठी आईने आधीच सरबत **करून** ठेवले.
(गुण १)
**ब)** जॉन मित्रांना पाहताच **पळत** सुटला.
(प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न १७)** सरांनी आशुतोषला, ''**या** वह्या घेऊन जा'' असे सांगितले.
''**कोणी** वह्या आणल्या नाहीत? ते विचार,'' असे म्हणाले.
**त्याने** मुलांना निरोप दिला. **तो** अभ्यासाला बसला. (गुण २)
(प्रत्येक योग्य सर्वनामाला अर्धा याप्रमाणे एकूण दोन गुण.)

**प्रश्न १८)** 'जाडेभरडे' आणि 'बर्फाच्छादित' (गुण २)
शब्दांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य बरोबर लिहिल्यास प्रत्येकी एक गुण द्यावा.



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न १९)** कर्ता - शबाना (गुण १)
कर्म - चित्र
(प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न २०)** विशेषण - दुप्पट (गुण १)
विशेष्य - गुंतवणूक
(प्रत्येकी अर्धा याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न २१) खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती

**उद्दिष्ट** : लेखी स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान** : **प्रमाण भाषेचा वापर अपेक्षित नाही.**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन किंवा अर्धवट वाक्य. |
| १ | दिलेल्या प्रसंगाचा सुटा सुटा विचार करून वाक्यांचे लेखन, वाक्यात सलगता नाही. |
| २ | • दिलेल्या प्रसंगाचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना दिलेल्या सर्व तपशिलांचा वापर नाही.<br>• दोन वेगवेगळ्या व्यक्तिरेखा उभ्या केलेल्या नाहीत. |
| ३ | • दिलेल्या प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाक्यरचना काही ठिकाणी विस्कळीत असू शकते.<br>• दोन व्यक्तिरेखा काही प्रमाणात उभ्या करण्याचा प्रयत्न.<br>• लिखाणात काही ठिकाणी सलगता, सुसंगतपणा नाही. त्यामुळे संपूर्ण संवादाचा एकत्रित विचार करून अर्थबोध नाही. |
| ४ | • दिलेल्या प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद लेखन केले आहे.<br>• संवादाला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• पात्रे व त्यांची भूमिका यांचा फारसा विस्तार केलेला नाही.<br>• दिलेल्या तपशिलांचा मर्यादित विस्तार |
| ५ | • दिलेल्या प्रसंगाचा संदर्भ लक्षात घेऊन संवाद लेखन केले आहे. संवादाला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• संवाद खुलविण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत.<br>• पात्रांची व्यक्तिरेखा विकसित केलेली दिसते.<br>• दिलेल्या तपशिलांची सविस्तर मांडणी करून लेखन खुलविण्याचा प्रयत्न. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**प्रश्न २२) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना करून तू तुझ्या भाषेत लिही.** (गुण ५)

१) मोबाईलवर बंदी आली तर... २) शाळेला दप्तरच नसेल तर...

३) सूर्य उगवला नाही तर... ४) सायकल बोलू लागली तर...

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती

**उद्‌दिष्ट** : लेखी स्व-अभिव्यक्ती तपासणे.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयांचा विचार न करता केलेले असंबद्ध लेखन किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | विषयाचे शीर्षक वापरून केलेले वाक्यांचे सुटे सुटे लेखन, काही शब्द बदलून केलेले वाक्यांचे परत परत लेखन. |
| २ | विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन केलेले लेखन ज्यात,<br>• वाक्यरचना तुटक आहे.<br>• विषयाला धरून वरवरचे, ढोबळमानाने केलेले लेखन, लेखनात विस्कळीतपणा आहे. |
| ३ | विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन केलेले लेखन ज्यात,<br>• वाक्यरचना काही ठिकाणी नीट आहे.<br>• लेखन मुद्‌देसूद करण्याचा प्रयत्न दिसतो.<br>• कल्पना विस्तार मर्यादित व अगदीच थोडा केलेला आहे. |
| ४ | • लेखनाला सुरुवात व शेवट अशी रचना करण्याचा प्रयत्न.<br>• वाक्यरचना नीट आहे (एक-दोन ठिकाणी विस्कळीत असू शकते)<br>• काहीच कल्पनांचा विस्तार सविस्तर केलेला आहे. |
| ५ | • लेखनाला सुसंगत सुरुवात व शेवट आहे.<br>• वाक्यरचना नीट आहे.<br>• कल्पनांचा विस्तार नेमका व विषयाला धरून झाला आहे.<br>• लेखनात बारकावे व तपशील दिल्याने लेखन प्रभावी झाले आहे. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न २३) मित्राला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याकरिता पत्र लिही.** (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती

**उद्दिष्ट** : लेखी स्व-अभिव्यक्ती तपासणे.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या संदर्भाचा विचार न करता केलेले असंबद्ध लेखन किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | दिलेल्या मुद्द्यांचा विचार करून वाक्यांचे सुटे सुटे लेखन. |
| २ | • दिलेल्या मुद्द्यांचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना लेखाचा तपशील दिलेला नाही.<br>• पत्राची रचना विस्कळीत आहे. |
| ३ | • दिलेल्या मुद्द्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• लेखाचा आशय लक्षात येईल असे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• पत्रातील लिखाण ओघवते नसले तरी वाक्यरचना नीट आहे. लिखाणात काही ठिकाणी सलगता, सुसंगतपणा नाही.<br>• विषयाचा विस्तार थोडक्यात आणि मर्यादित केलेला आहे. |
| ४ | • दिलेल्या मुद्द्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र लिहिलेले आहे.<br>• पत्राची सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• तपशिलाचा मुद्देसूद विस्तार केला आहे. |
| ५ | • दिलेल्या मुद्द्यांचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र लिहिलेले आहे.<br>• पत्राला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• पत्राचा आशय मुद्देसूद आहे. बारकावे व तपशील दिले आहेत.<br>• पत्र लिहिण्यामागची भूमिकाही स्पष्ट केली आहे. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**संच : क**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**तिचा स्वभाव तसा चंचलच होता. म्हणून पेशवे तिला लाडाने ‘छबिली’ असं म्हणायचे.**

**कुठेही जायचं असलं तरी तिघं बरोबर असायचे. फिरायला जाताना, खेळताना, कुठेही त्यांचे त्रिकूट असायचे.**

**नानासाहेब आणि रावसाहेब यांच्याबरोबर मनूचेही शिक्षण सुरू झाले.**

**मनू मुळातच हुशार होती. त्यामुळे तिला काहीही शिकवले तरी ती पटकन शिकायची. मनू युद्धकलेचेही शिक्षण शिकली. लिहिणे-वाचणे, याबरोबर तलवार चालवणे, घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक वगैरे सगळ्या गोष्टी मनू पटकन शिकली.**

**त्या काळात स्त्रियांना असले शिक्षण कधीच दिले जात नसे. त्यामुळे मनूचे सगळ्यांना कौतुक वाटत असे.**



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण** **योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) मनूला पेशवे लाडाने कोणत्या नावाने हाक मारत असत?** (१) (ब)

अ) छकुली

ब) छबिली

क) छुटकी

**तोंडी प्रश्न ३) मनू कोणकोणत्या गोष्टी शिकली?** (२)

(युद्धकला, लिहिणे-वाचणे, तलवार चालवणे,
घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक)

**तोंडी प्रश्न ४) त्रिकूटामध्ये कोणाकोणाचा समावेश असायचा?** (२)

(नानासाहेब, रावसाहेब आणि मनू)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 7/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*